**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University
PART – TWO

(असाधारण)
**सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०१७**

# अधिसूचना

क्र.९२/२०१७ दिनांक : ३१ जुलै,२०१७

**विषय : अधिसभा निवडणूक-२०१७**
**नोंदणीकृत पदवीधर मतदार गट.... मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याबाबत**

संदर्भ : १) अधिसूचना क्र.३०/२०१५, दि. ६.४.२०१५
२) अधिसूचना क्र.४०/२०१५, दि. ५.५.२०१५
३) अधिसूचना क्र.४१/२०१५, दि.७.५.२०१५
४) अधिसूचना क्र.३५/२०१७, दि.१.६.२०१७
५) अधिसूचना क्र.४७/२०१७, दि.१७.६.२०१७

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ९९ आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३१ मधील तरतुदीनुसार पदवीधारकांकडून ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जाची छाननी करण्यात आली असून विद्याशाखानिहाय वैध ठरलेल्या पदविधारकांची नावे पंजीकृत पदवीधर म्हणून **Volume-VI** मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

याअन्वये, सर्व संबंधितांच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कायदा, २०१६ कलम २८ च्या पोटकलम (२) खंड (न) अन्वये अधिसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीकरिता नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविलेल्या व्यक्तींमधून निर्वाचन गणांची (Electoral College) रचना करावयाची आहे. त्यासाठी मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्यास इच्छूक असणाऱ्या **Volume-I ते VI** मधील नोंदणीकृत पदवीधरांना निदेश क्र.५/२०१७, दि. १.७.२०१७ अन्वये विहित केलेल्या नमुन्यानुसार **(Appendix-A) दि.१६.८.२०१७ पर्यंत Online** अर्ज भरता येतील. या करिता विद्यापीठाच्या **www.sgbau.ac.in** या संकेतस्थळावरील **Election Portal** वरील मतदार म्हणून नाव नोंदणीसाठी अर्ज (Application for Enrolling as Voter) वर भेट द्यावी. तसेच, Online अर्ज भरल्यानंतर एक शाईची स्वस्वाक्षांकित प्रत (Signed Hard copy) विद्यापीठाकडे **दि. १७.८.२०१७** रोजी सायंकाळी ५.०० वा.पर्यंत अथवा तत्पूर्वी विद्यापीठाच्या केंद्रीय आवक शाखेकडे सादर करावी.

स्वा-
(डॉ.अजय प्र.देशमुख)
कुलसचिव तथा निवडणूक निर्वाचन अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

क्र. ९३/२०१७ दिनांक - ३१.७.२०१७

**विषय : मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा येथे बी.एस्सी. अभ्यासक्रम सुरु करणेबाबत.**

सर्व सामान्यांचे माहितीकरीता सुचित करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेने दि. २०.६.२०१७ च्या सभेत विषय क्र. १४३ अन्वये मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा येथे बी.एस्सी. अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार, शैक्षणिक सत्र २०१७-१८ पासून मॉडेल डिग्री कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अॅन्ड कॉमर्स (विद्यापीठाचे घटक महाविद्यालय), बुलढाणा येथे बी.एस्सी. अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहे.

आदेशान्वये –

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## NOTIFICATION

No . 94/2017 Date : 31/7/2017

**Subject :- Change in the name of College.**

It is notified for general information of all concerned that the Management Council of Sant Gadge Baba Amravati University in its meeting dated 20.06.2017 vide item No.131, has accorded permission to change the existing name of the college as the name mentioned in column No. 2 below :-

| Existing Name of College | Change in Name |
|---|---|
| 1. | 2. |
| श्री.ज्ञानेश्वर मस्कुजी बुरुंगले विज्ञान महाविद्यालय, शेगांव,जि.बुलडाणा | श्री.ज्ञानेश्वर मस्कुजी बुरुंगले विज्ञान व कला महाविद्यालय, शेगांव, जि.बुलडाणा |

Sd/-
Registrar,
Sant Gadge Baba Amravati University.

*****